ठाणे, मंगळवार दि. २४ मार्च २०२६ वर्ष : १४, अंक : ३२५, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**नैतिकतेला हादरा**

महाराष्ट्रात वेळोवेळी अनेक घोटाळे उघडकीस येतात; पण काही प्रकरणे समाज, राजकारण, प्रशासन आणि नैतिकतेच्या चौकटीला हादरा देतात. भोंदू ज्योतिषी म्हणून ...पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com


**तापमान**

कमाल ३९° से | किमान २३° से

**बाजार**

सोने १,३५,५६० | चांदी २,३०,०००

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मी या वस्तीत का आलो ? अरे, तुम्हीच या वन हद्दीत अतिक्रमण केलेत, त्याला मी काय करणार ?

## ठाणे महापालिकेच्या कारभाराचा पाढा विधानसभेत...

एकीकडे साताऱ्यात महायुतीमधील शिवसेना आणि भाजप या 2 मित्रपक्षांमध्ये वाद पेटलाय.. अशातच आता ठाण्यातही या 2 मित्रपक्षांमध्ये वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे.. कारण ठाण्यातील भाजप आमदार संजय केळकर यांनी आज ठाणे महापालिकेच्या कारभाराचा पाढा थेट विधानसभेत मांडला.. एकनाथ शिंदेंनी महापालिकेला दिलेल्या पैशांचा हिशोब मिळावा अशी मागणी करत महापालिकेने पैशांचा तपशील दिला नसल्याची तक्रारच विधानसभेत केली..

# ठाणे महापालिकेचा ६२२१ कोटी १२ लक्ष रूपयांचा अर्थसंकल्प सादर



**सन 2026-27 च्या मूळ अर्थसंकल्पातील प्रमुख उद्दिष्टे :**

- कोणतीही करवाढ नसणारा अर्थसंकल्प
- महसुली उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न
- आर्थिक शिस्त व संतुलन राखणे
- आरोग्य व शिक्षण यामध्ये गुंतवणूक
- हरित ठाण्यासाठी शाश्वत उपाययोजना
- पर्यावरण संरक्षण
- गतिमान वाहतुकीसाठी पायाभूत सुविधांची कामे
- प्रशासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता व कार्यक्षमता यावर भर
- महापालिका शाळांचा कायापालट व गुणवत्तापूर्ण शिक्षणांवर भर
- महिला, ज्येष्ठ नागरिक व कल्याणकारी योजनांना गती

**ठाणे -कोणतीही करवाढ नसलेला तरीही महसुली उत्पन्न वाढविण्यावर भर, कामांचा दर्जा उत्तम रहावा याकडे विशेष लक्ष देणारा सन 2026-2027 चा 6221 कोटी 12 लक्ष रूपयांचा मूळ अर्थसंकल्प काल, सोमवारी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांना विशेष सर्वसाधारण सभेत सादर केला. नागरिकांना चांगेल जीवनमान देता यावे यासाठी महापालिका कटीबद्ध असून अर्थसंकल्पाची त्यादृष्टीने मांडणी करण्यात आल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी अर्थसंकल्पीय सभेत केले. या सभेच्या अध्यक्षस्थानी महापौर शर्मिला पिंपळोलकर होत्या.**

तसेच परिवहन सेवेचा 791 कोटी 86 लक्ष रुपयांचा मूळ अर्थसंकल्प परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे यांनी महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्याकडे सादर केला. यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील, अतिरिक्त आयुक्त (1) संदीप माळवी, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, सर्वपक्षीय गटनेते पवन कदम, माजी स्थायी समिती सभापती राम रेपाळे, मुकेश मोकाशी, अभिजीत पवार, सरफराज खान उर्फ सैफ (पान 2 वर )






अर्थसंकल्प सादर करण्यासाठी सभागृहात जात असताना महापालिका आयुक्त सौरभ राव सोबत परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहेरे

**परिवहन सेवेचा 791 कोटी 86 लक्ष रुपयांचा अर्थसंकल्प सादर**

## मनुष्य हस्तक्षेप विरहीत कर आकारणी संगणक प्रणाली:

■ **ठळक वैशिष्टे :** ब्लॉक क्रमांक नमूद करताच वाजवी भाडे व भारांक याप्रमाणे गणना करण्यात येणार असून, संगणकीय कॅलक्युलेशन्ससह सदनिकानिहाय कर योग्य मूल्य थेट गणना संगणकीय आकारणी अहवाल व मोजमाप दरपत्रके उपलब्ध होणार आहे.

■ **फलनिष्पती :** कर आकारणीमध्ये सुसूत्रता व समानता, गणितीय अचूकता, ऑडीट पॅरामध्ये घट, स्वतंत्र संगणकीय अभिलेख उपलब्ध होणार आहे.

### आर्थिक वर्षाच्या पहिल्या दिवशी कराचे देयक तयार करणे.

■ **ठळक वैशिष्टे :** 1 एप्रिल रोजी पहाटे 5 वाजेपर्यंत संगणकीय देयके तयार करण्यात येणार असून, करदात्यांना Sms पाठविण्यात येतील. त्यामध्ये कराचे देयक व ऑनलाईन कर भरण्याची लिंक उपलब्ध होईल.

■ **फलनिष्पती :** लिंकच्या माध्यमातून कर भरण्यास सुलभता येईल व करदात्यास संगणकीय देयक व पावती उपलब्ध होईल. पहिल्याच दिवशी सुमारे रु.1.60 कोटी तसेच माहे एप्रिलमध्ये अंदाजे रु.62 कोटी कर जमा करण्याचे उद्दिष्ट आहे.

■ **(BPMS) मालमत्ता कर संगणक प्रणाली इंटिग्रेशन -** यामुळे कर आकारणीची खात्री होणार असून, REAL TIME माहिती प्राप्त होईल.

■ **(IGR) मालमत्ता कर संगणक प्रणाली इंटिग्रेशन -** विक्री नोंदणीबाबतची माहिती मिळणे शक्य होणार असून मालमत्ता कर दायित्व हस्तांतरण शक्य होणार आहे.

## प्रस्तावित नाविन्यपूर्ण उपक्रम

■ **Whatsapp ChatBot: कर प्रणाली -** यामुळे दोन स्टेपमध्ये कराचे देयक भरणे शक्य होणार असून करदात्यांना संगणकीय कराचे देयक व पावती मिळणे शक्य होणार आहे.

■ **ई बिलींग संकल्पना**

- ग्रीन इनिशिएटिव्ह अंतर्गत ऑनलाईन पध्दतीने देयक.
- बिल प्रिंट करणे व वितरीत करणेमध्ये आर्थिक बचत.
- नागरिकांची माहिती (KYC) करणे अद्ययावत करणे शक्य होईल.

■ **जमिनीवरील कर आकारणी प्रणालीत सुधारणा.**

मंजूर बिल्ट अप क्षेत्रफळाऐवजी प्लॉट क्षेत्रफळावर आकारणी होणार असून, शहर विकास विभागाकडील अभिलेखानुसार तात्काळ कर आकारणी शक्य होणार आहे. यामुळे जमिनीवरील कर आकारणीत सुलभता येऊन आकारणीमध्ये एकसुत्रीपणा व समानता येणार असून,कमी कालावधीमध्ये कर आकारणी शक्य होणार आहे.

■ सन 2026-27 या आर्थिक वर्षात देखील पहिल्या सहामाही सोबत दुसऱ्या सहामाहीचा कर भरणाऱ्या करदात्यांना पुढीलप्रमाणे सवलत/सूट असणार आहे.

| अ.क्र. | कालावधी | दुसऱ्या सहामाहिच्या सामान्य करात सवलत |
|---|---|---|
| 1. | दि.01 एप्रिल 2026 ते दि.30 जून 2026 | 10% |
| 2. | दि.01 जुलै 2026 ते दि.31 जुलै 2026 | 3% |
| 3. | दि.01 ऑगस्ट 2026 ते दि.31 ऑगस्ट 2026 | 2% |

## स्थानिक संस्था कर :

स्थानिक संस्था कर विभागाकडे वस्तू व सेवाकर अनुदानापोटी रु.1233 कोटी 79 लक्ष , मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान रु.200 कोटी, स्थानिक संस्था कराची मागील वसुली रु. 8 कोटी असे एकूण रु. 1441 कोटी 79 लक्ष उत्पन्न अपेक्षित केले होते. शासनाकडून वस्तू व सेवाकर अनुदानाची रक्कम नियमितपणे प्राप्त होत असून डिसेंबर 2025 अखेर प्रत्यक्षात रु.917 कोटी 18 लक्ष प्राप्त झाले आहे. मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अपेक्षित धरलेल्या अनुदानापैकी आतापर्यंत रु.217 कोटी 27 लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु 1% मुद्रांक शुल्क अधिभाराची महापालिकेस प्राप्त होणा-या रकमेची थकबाकी रु. 438 कोटी इतकी असून सुधारित अंदाज रु. 250 कोटी अपेक्षित केले आहे. तसेच स्थानिक संस्था कराच्या मागील थकबाकी वसुलीपोटी अपेक्षित उत्पन्नापैकी डिसेंबर 2025 अखेर रु. 4 कोटी 68 लक्ष प्राप्त झाले असल्याने सुधारित अंदाज रु. 6 कोटी करण्यात आले आहे.

या सर्व बाबींचा विचार करुन स्थानिक संस्था कर विभागाचे सुधारित अंदाज एकूण रु. 1495 कोटी 18 लक्ष अपेक्षित केले आहेत.

तसेच सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठी वस्तू व सेवाकर अनुदानापोटी रु. 1332 कोटी, मुद्रांक शुल्क अधिभारापोटी अनुदान रु.300 कोटी, स्थानिक संस्था कराची मागील वसुली रु. 1 कोटी असे एकूण रु.1633 कोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

## विकास व तत्सम शुल्क :

सन 2025-26 मध्ये शहर विकास विभागाकडून विकास व तत्सम शुल्कापोटी रु. 650 कोटी 80 लक्ष उत्पन्न अपेक्षित केले होते. शहर विकास विभागाकडून प्राप्त झालेले डिसेंबर 2025 अखेरचे उत्पन्न रक्कम रु. 256 कोटी 34 लक्ष विचारात घेऊन शहर विकास विभागाकडील उत्पन्न रक्कम रु.553 कोटी सुधारित करण्यात आले आहे.

सन 2026-27 या आर्थिक वर्षात रु. 663 कोटी इतके उत्पन्न अपेक्षित करण्यात आलेले आहे.

## जाहिरात फी :

जाहिरात विभागामार्फत नवीन धोरणे आखून मार्गदर्शक तत्वे व शहराच्या सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने योग्य नियमन करुन उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न केले जातील. जाहिरात फी पोटी सन 2025-26 मध्ये रु. 22 कोटी उत्पन्न अपेक्षित केले होते. डिसेंबर 2025 अखेर प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न रु.14 कोटी 73 लक्ष झाले असल्याने सुधारित अंदाजपत्रकात जाहिरात फी पासून रु.19 कोटी 35 लक्ष उत्पन्न अपेक्षित केले असून सन 2026-27 मध्ये रु.40 कोटी 35 लक्ष उत्पन्न अंदाजित केले आहे.

## स्थावर मालमत्ता विभाग :

सन 2025-26 या आर्थिक वर्षात स्थावर मालमत्ता विभागाकडून रु.15 कोटी 41 लक्ष अपेक्षित केले होते ते सुधारित अंदाज रु.18कोटी 21 लक्ष अपेक्षित केले आहे. सन 2026-27 मध्ये स्थावर मालमत्ता विभागाकडून रु.16 कोटी 96 लक्ष उत्पन्न अपेक्षित करण्यात आले आहे.

■ **अनुदाने :** सन 2025-26 मध्ये डिसेंबर 2025 अखेर शासनाकडून रु. 1269 कोटी 61 लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश आहे.

सन 2026-27 मध्ये शासनाकडून अंदाजित रु.428 कोटी 51 लक्ष अनुदान अपेक्षित केले आहेत.

■ **गुंतवणुकीव्दारे व्याज :** अतिरिक्त किंवा तत्काळ वापरासाठी न लागणाऱ्या सर्व निधींचे नियोजन करुन गुंतवणुकीद्वारे सन 2025-26 मध्ये मनपाला रु.150 कोटी इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. अधिशेष रकमेच्या पारदर्शक आणि स्पर्धात्मकरित्या दर प्राप्त करुन केलेल्या गुंतवणुकीमधून त्याद्वारे सर्व निधींपासून सन 2026-27 मध्ये रु.50 कोटी इतका अतिरिक्त महसुल प्राप्त होणे अपेक्षित आहे.

■ **म्युनिसिपल बॉन्ड आणि ग्रीन बॉन्ड :** शाश्वत पायाभूत सुविधा, घनकचरा व्यवस्थापन, STP, Cluster Development इ. प्रकल्पांसाठी निधी उभारण्याच्या दृष्टीकोनातून ठाणे महानगरपालिकेने म्युनिसिपल बॉन्ड आणि ग्रीन बॉन्ड निर्गमित करण्याचे योजिले आहे. सदर कर्ज रोखे हे अनुक्रमे हे पायाभूत सुविधा तसेच पर्यावरणपुरक उपक्रमांसाठी वापरले जाणार असून यामुळे आर्थिक शिस्त लागून पारदर्शकता वाढण्यास मदत होईल. यासाठी क्रेडीट रेटींग एजन्सीची नियुक्ती करण्याची प्रक्रिया चालू असून केंद्रीय अर्थसंकल्पातून देखील यासाठी ठोस अनुदान मिळणार आहे.

आजमितीस महापालिकेवर रु. 33 कोटीचे कर्ज शिल्लक आहे. या शिवाय केंद्र शासनाकडून विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी सन 2024-25 मध्ये रु.115 कोटी व सन 2025-26 मध्ये रु.98 कोटी 68 लक्ष बिनव्याजी अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले आहे. केंद्र शासनाने अमृत 2.0 अंतर्गत पाणी पुरवठा विस्तार व एकात्मिक तलाव संवर्धन व सुशोभीकरणासाठी रु.555.16 कोटी रकमेचा डि.पी.आर. मंजूर केला असून या अंतर्गत केंद्र शासनाचा 25%, राज्य शासनाचा 25% व महापालिकेचा 50% हिस्सा असणार आहे. महापालिका हिस्स्याची रक्कम म्युनिसिपल बॉन्ड उभारुन किंवा कर्जाद्वारे उपलब्ध करुन घेण्याचे नियोजन आहे. सन 2026-27 मध्ये कर्जाद्वारे रु.62 कोटी 41 लक्ष अपेक्षित केले आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानापैकी मार्च 2025 अखेर अखर्चित निधी दि.1.4.2025 च्या आरंभिच्या शिल्लकेमध्ये समाविष्ट आहे. सन 2024-25 ते सन 2025-26 मध्ये केंद्र व राज्य शासनाकडील प्राप्त निधीमधून हाती घेतलेली कामे प्रगतीपथावर आहेत. सन 2025-26 मध्ये शिल्लक राहणारी अंदाजित अखर्चित रक्कम सन 2026-27 च्या आरंभिच्या शिल्लकेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

अशा प्रकारे सन 2025-26 चे रु. 5645 कोटी चे मूळ अंदाज सुधारित करुन आरंभिच्या शिल्लकेसह रु. 7089 कोटी 39 लक्ष व सन 2026-27 चे आरंभिच्या शिल्लकेसह मूळ अंदाज रु. 6221 कोटी 12 लक्ष जमा बाजूस अपेक्षित केले आहे.

## अग्निशमन दल :

अग्निशमन विभागाकडून मूळ अंदाज रु.127 कोटी 03 लक्ष अपेक्षित केले होते. शासनाने फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस व फायर प्रिमियम चार्जेस बंद करुन अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी सुरु केली आहे. अग्निशमन विभागास डिसेंबर 2025 अखेर प्रत्यक्ष रु. 45 कोटी 90 लक्ष प्राप्त झाले असून रु. 100 कोटी 60 लक्ष सुधारित अंदाज प्रस्तावित केले आहे. सन 2026-27 या आर्थिक वर्षासाठी रु.130 कोटी 03 लक्ष उत्पन्न अपेक्षित केले आहे.



## पाणी पुरवठा आकार



: पाणी पुरवठा आकारासाठी सन 2025-26 मध्ये रु.250 कोटी उत्पन्न अपेक्षित होते. यामध्ये मोठया प्रमाणात घट दिसून येत आहे. पाणी पुरवठा आकाराचे सुधारित अंदाज रु. 160 कोटी अपेक्षित केले असून सन 2026-27 मध्ये रु.250 कोटी उत्पन्न अपेक्षित केले आहे.

## पाणी पुरवठा विभागाचे प्रशासकीय प्रयत्न

■ सन 2021-26 या 05 वर्ष कालावधीमध्ये एकूण 12,516 संयोजनांना अनधिकृत पाण्याचा वापर अतिभार योजनेअंतर्गत पाणी बील आकारणी करण्यात आले.

■ सन 2021-26 या 05 वर्ष कालावधीमध्ये एकूण 20,556 संयोजने पाणी बील वसुलीसाठी खंडीत करण्यात आली. तसेच 1546 पंप रुम सील करण्यात आले, 4,500 पंप जप्त करण्यात आले.

■ विविध प्रकारच्या व्यासाच्या पाईप लाईनवरील एकूण 9700 ठिकाणच्या गळत्या बंद करण्यात आल्या. यामध्ये काही ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरा व लिक डिटेक्शन यंत्रणेचा वापर करण्यात आला.

■ बृहन्मुंबई महापालिकेकडून बाळकुम येथे 5 द.ल.लि. प्रतिदिन अतिरिक्त पाणी पुरवठा दि.02.04.2025 रोजी घेऊन रुतुसिटी, विजयनगरी, ट्रॅफिक पार्क व हिरानंदानी इस्टेट या भागातील पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यात आली.

■ सन 2025-26 या वर्षात मा. महासभा प्रशासकीय मान्यता ठराव क्र. 445 दि.07.11.2025 अन्वये, थकीत बिलावरील प्रशासकीय आकारामध्ये 100% सुट / सवलत दि.01.12.2025 पासून लागू करण्यात आली. यामुळे रु.55.35 कोटी जमा झाले असून, नागरिकांना रु.3.15 कोटी प्रशासकीय आकारात सवलत देण्यात आली.

■ सन 2026-27 मध्ये पाणी पुरवठा आकाराच्या वसुलीसाठी विशेष मोहिम राबवून, सर्वे करुन अनधिकृत नळ कनेक्शन शोधून व दंडात्मक कार्यवाही करुन त्यांचा नियमित वसुलीमध्ये समावेश करुन वसुलीमध्ये वाढीसाठी प्रयत्न करण्यात येतील.

## खर्च बाजू

महसुली खर्चापेक्षा भांडवली कामांवर जास्तीत जास्त खर्च होणे हे महापालिकेच्या सुदृढ आर्थिक स्थितीचे लक्षण आहे. परंतु कोरोना कालावधीपासून यामध्ये बदल झालेला दिसून येतो. पूर्ण झालेल्या भांडवली कामांच्या दुरुस्ती देखभालीचा खर्च, आरोग्य, घनकचरा व्यवस्थापन, पाणी पुरवठा, मलनि:सारण , सुरक्षा व्यवस्था, शिक्षण इत्यादी विभागांवरील महसुली खर्च, पाणी खरेदी, विज खरेदी , कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दयावयाच्या सातव्या वेतन आयोगाचा फरक, परिवहन उपक्रमास संचलन तूट अर्थसहाय्य इत्यादी खर्चातील वाढ यामुळे भांडवली खर्चावर मर्यादा येत आहे.

**महसुली खर्च आणि भांडवली खर्चाची एकूण खर्चाशी टक्केवारी पुढीलप्रमाणे (रु.कोटीत)**

| वर्ष | एकूण खर्च | महसुली खर्च | टक्केवारी | भांडवली खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 2021-22 | 2895.03 | 1960.54 | 67.72% | 934.49 | 32.28 % |
| 2022-23 | 2954.50 | 1981.25 | 67.06% | 973.25 | 32.94% |
| 2023-24 | 3925.18 | 2418.06 | 61.60% | 1507.12 | 38.40% |
| 2024-25 | 4193.84 | 2723.76 | 64.95% | 1470.08 | 35.05% |
| 31/12/25 | 3290.09 | 2250.09 | 68.39% | 1040.01 | 31.61% |

## विकास योजना प्रगती आढावा :-

### विभागाची महत्त्वपूर्ण कामगिरी (2021-22 ते 2025-26)

■ स्वच्छ सर्वेक्षण मध्ये ठाणे शहराचा राष्ट्रीय क्रमांक ४४ वरून २४ आणि सद्यस्थितीत सदरचा क्रमांक 15 असा आहे.

■ ठाणे शहराला पहिल्यांदाच Water Plus आणि Garbage Free City ३ स्टार रेटिंग प्रमाणपत्र प्राप्त झाले.

■ शासनाच्या नगर विकास विभागाच्या २०२२ शहर सौंदर्यीकरण व स्वच्छता स्पर्धेत ठाणे महानगरपालिकेस द्वितीय क्रमांक मिळाला

■ ISL 2.0 अंतर्गत “Youth vs Garbage” या कार्यक्रमात ६०,००० हून अधिक ठाणेकरांचा सहभाग

■ महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक आठवड्याला सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे.

■ दिवा आणि भंडार्ली येथील जुन्या क्षेपणभूमीचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करणेकामी एकूण ८.३ लक्ष मेट्रीक टन जुन्या कच-यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.

### विभागाची सुरु असलेली कामे (सन 2025-26)

**मौजे आतकोली येथे 600 ते 800 TPD क्षमतेचा घनकचरा प्रक्रिया प्रकल्प :**

घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करणेकामी शासनाकडून ठाणे महानगरपालिकेसाठी मौजे आतकोली ता.भिवंडी येथे 35 हेक्टर जागा मालकी तत्वावर देण्यात आलेली आहे. सदर जागेवर घनकचरा विभागामार्फत 600 ते 800 TPD क्षमतेचा घनकचरा प्रक्रिया पूर्व प्रकल्प उभारणीच्या

### घनकचरा व्यवस्थापन

(भांडवली खर्च रु.114.72 कोटी + महसुली खर्च रु.533.47 कोटी = एकूण रु. 648.19 कोटी)

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## भारत सरकारची कसोटी

पश्चिम आशियात तणावाचे ढग दाटून आले आहेत. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत या परिस्थितीवर केलेले वक्तव्य हे केवळ परराष्ट्र धोरणाचे निवेदन नाही, तर देशासमोर असलेल्या आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या संकटाची गंभीर जाणीव करून देणारे आहे. लोकसभेमध्ये बोलताना पंतप्रधानांनी, भारताकडे ५.३ दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध आहे असे सांगितले, ही बाब दिलासादायक आहे. परंतु या वक्तव्याच्या पाठीमागे दडलेले संकट तितकेच गंभीर आहे. पश्चिम आशियात इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यात निर्माण झालेल्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता निर्माण झाली आहे. या संघर्षाचे परिणाम जगावर होत आहेत. तेल, गॅस, खत, अन्नधान्य आणि जागतिक पुरवठा साखळी या सर्व गोष्टींवर त्याचा थेट परिणाम दिसू लागला आहे. अशा वेळी भारतासारख्या मोठ्या आणि आयात–आधारित अर्थव्यवस्थेसाठी ही परिस्थिती अत्यंत धोकादायक ठरू शकते.

पंतप्रधान म्हणाले, भारत ४१ देशांकडून ऊर्जा आयात करतो. याचा अर्थ, सरकारने पुरवठ्याचे स्रोत विविध केले आहेत. ही गोष्ट सकारात्मक असली तरी भारत अजूनही ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर नाही. देशाच्या एलपीजी गरजेपैकी सुमारे ६० टक्के गरज आयातीवर अवलंबून आहे, हे वास्तव आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेतील सर्वात मोठा धोका म्हणजे स्ट्रेट ऑफ होर्मुझ होय. या सामुद्रधुनीतून जगातील मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूची वाहतूक होते. या मार्गावर तणाव निर्माण झाला की, भारतासह आशियातील अनेक देश अडचणीत येतात. पंतप्रधानांनी लोकसभेत सांगितले की या मार्गावर जहाजांची वाहतूक करणे सध्या आव्हानात्मक बनले आहे. परिस्थिती किती गंभीर आहे, याचे स्पष्ट द्योतक आहे. भारतातील उद्योग, शेती, वाहतूक, वीज निर्मिती, रसायन उद्योग या क्षेत्रांना ऊर्जा आवश्यक आहे. अशा परिस्थितीत जर कच्च्या तेलाचा पुरवठा अडखळला, तर त्याचा परिणाम महागाईवर, रोजगारावर आणि सामान्य नागरिकांच्या जीवनमानावर होणार आहे.

पश्चिम आशियातील परिस्थिती लक्षात घेऊन पंतप्रधानांनी तीन तासांहून अधिक वेळ चाललेली उच्चस्तरीय बैठक घेतली. पेट्रोलियम, नैसर्गिक वायू, वीज, खत आणि पुरवठा साखळी याबाबत चर्चा करण्यात आली. पंतप्रधानांनी इशारा दिला की, देशात साठेबाजी आणि काळाबाजार अजिबात सहन केला जाणार नाही. भारतात प्रत्येक संकटकाळात काही व्यापारी आणि साठेबाज लोक परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. कोविड काळात ऑक्सिजन सिलिंडरपासून औषधांपर्यंत अनेक वस्तूंमध्ये काळाबाजार झाला होता. आता तेल आणि गॅसचा प्रश्न गंभीर झाला, तर त्याचा थेट परिणाम एलपीजी सिलिंडर, पेट्रोल–डिझेल आणि खतांच्या किमतींवर होऊ शकतो. त्यामुळे सरकारने साठेबाजीवर कठोर कारवाई करणे काळाची गरज आहे. पंतप्रधानांनी भाषणात महत्त्वाचा मुद्दा मांडला की, युद्धाचा परिणाम ऊर्जा क्षेत्रावरच नाही, तर जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे. जगात मंदीची भीती आहे. अशा वेळी पश्चिम आशियात युद्धाची परिस्थिती निर्माण झाली, तर तेलाचे दर वाढतील, वाहतूक खर्च वाढेल आणि त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किमतींवर होईल. भारतासारख्या विकसनशील देशासाठी ही परिस्थिती अधिक कठीण आहे. कारण भारत अजूनही मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून आहे. कच्चे तेल, नैसर्गिक वायू, खत, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अनेक औद्योगिक कच्चा माल परदेशातून येतो. त्यामुळे जागतिक बाजारात अस्थिरता निर्माण झाली, तर भारतातील महागाई वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. पश्चिम आशियात सुमारे १ कोटी भारतीय राहतात, ही बाब पंतप्रधानांनी लोकसभेत अधोरेखित केली. आतापर्यंत ३ लाख ७५ हजार भारतीयांना सुरक्षित मायदेशी आणण्यात आले आहे, हे निश्चितच सरकारचे यश आहे. इराणमधून परतलेल्या वैद्यकीय विद्यार्थ्यांची सुटका ही आव्हानात्मक प्रक्रिया होती. भविष्यात परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि कामगारांसाठी अधिक सुरक्षित धोरण तयार करण्याची गरज आहे. पंतप्रधान म्हणाले, देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावर सरकार भर देत आहे. नॅनो युरिया, नैसर्गिक शेती आणि ऊर्जा क्षेत्रातील आत्मनिर्भरता यावरही त्यांनी भर दिला. पण हा मार्ग अजूनही दूर आहे. भारताने गेल्या काही वर्षांत सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेमध्ये मोठी प्रगती केली आहे. तरीही देशाच्या एकूण ऊर्जापैकी मोठा भाग कच्च्या तेलावर अवलंबून आहे. वाहतूक व्यवस्था पूर्णपणे इलेक्ट्रिक नाही, औद्योगिक उत्पादन अजूनही जीवाश्म इंधनावर चालते आणि घरगुती वापरासाठी एलपीजीचा वापर मोठ्या प्रमाणात आहे. जर भारताने ऊर्जा क्षेत्रात खऱ्या अर्थाने आत्मनिर्भरता मिळवली नाही, तर अशा आंतरराष्ट्रीय संकटांचा फटका वारंवार बसत राहील. भारताने नेहमीच शांततेचा मार्ग स्वीकारला. परंतु राजकीय भूमिका पुरेशी नाही. त्यासोबतच देशांतर्गत पातळीवर मजबूत आर्थिक आणि ऊर्जा धोरणाची गरज आहे. आज भारत जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. पुढील काही वर्षांत भारत जगातील तिसऱ्या क्रमांकावर जाण्याचा दावा करत आहे. ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न कायम राहिला, तर हा विकासाचा वेग टिकवणे कठीण होईल. पश्चिम आशियातील युद्धाचा सर्वात मोठा परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. पेट्रोल–डिझेलच्या किमती वाढल्या की वाहतूक महाग, वाहतूक महाग झाली की, भाजीपाला, अन्नधान्य, दुध, गॅस सिलिंडर या सर्व गोष्टी महाग होतात. पंतप्रधानांनी लोकसभेत सांगितले की, देशातील नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, हा सरकारचा उद्देश आहे. पण त्यासाठी केवळ वक्तव्य पुरेसे नाही; प्रत्यक्षात महागाई नियंत्रणात ठेवणे हीच सरकारची खरी कसोटी असणार आहे. ऊर्जा, अन्नसुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा या तिन्ही क्षेत्रांमध्ये भारताला अधिक मजबूत बनावे लागणार आहे. ५.३ दशलक्ष मेट्रिक टन कच्च्या तेलाचा साठा ही चांगली गोष्ट ; पण दीर्घकालीन उपाय म्हणून भारताने ऊर्जा आयातीवरील अवलंबित्व कमी केले पाहिजे. केंद्र सरकारने आता, ऊर्जा आत्मनिर्भरता, महागाई नियंत्रण आणि परदेशात राहणाऱ्या भारतीयांची सुरक्षा या गोष्टींवर विशेष लक्ष द्यावे. पश्चिम आशियातील संघर्ष राजकारणाचा विषय नसून भारतीय अर्थव्यवस्थेशी जोडला आहे. नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत केलेले वक्तव्य परिस्थितीची गंभीरता दाखवणारे आहे. परंतु आता ठोस आणि दीर्घकालीन धोरणाची गरज आहे. आज भारताने ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न सोडवला, तर देशाचा विकास अधिक वेगाने होईल. अन्यथा, प्रत्येक आंतरराष्ट्रीय संकट भारताच्या अर्थव्यवस्थेला हादरे देत राहील. म्हणूनच या संकटाकडे केवळ तात्पुरती समस्या म्हणून नव्हे, तर भविष्यातील धोरण ठरवणारा निर्णायक क्षण म्हणून पाहण्याची गरज आहे.

## ठाणे महापालिकेचा ... अर्थसंकल्प सादर

**(पान 1 वरून )** पठाण आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आयुक्त सौरभ राव यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सन 2025-26 चा 5645 कोटी रकमेचा अर्थसंकल्प तयार करण्यात आला होता. यामध्ये पाणी पुरवठा आकार, व शहर विकास विभाग, अग्निशमन या विभागांच्या उत्पन्नात काही प्रमाणात घट येत आहे. त्यामुळे महसुली उत्पन्न रु. 3523 कोटी 79 लक्ष ऐवजी रु.3461 कोटी सुधारित करण्यात येत आहे. महापालिकेस प्राप्त होणा-या अनुदानाचा विचार करता, मूळ अर्थसंकल्पात अपेक्षित केलेल्या रु. 612 कोटी 59 लक्ष अनुदाना ऐवजी प्रत्यक्षात डिसेंबर 2025 अखेर रु. 1269 कोटी 61 लक्ष अनुदान प्राप्त झाले असल्याने सुधारित अर्थसंकल्पामध्ये अनुदान व सहाय्यक अनुदानापोटी रु.1493 कोटी 15 लक्ष अपेक्षित केले आहे व अमृत 2.00 योजनेसाठी रु. 60 कोटी 89 लक्ष कर्ज अपेक्षित धरण्यात आले होते परंतु अमृत 2.00 अंतर्गत कर्ज न घेता केंद्र शासनामार्फत बिनव्याजी अर्थसहाय्यापोटी 98 कोटी 68 लक्ष प्राप्त झाले आहे. खर्च बाजूस सन 2025-26 मध्ये महसुली खर्च रु. 3722 कोटी 93 लक्ष प्रस्तावित केला होता, तो सुधारित अंदाजपत्रकात रु.3440 कोटी 80 लक्ष अपेक्षित असून भांडवली खर्च रु.1921 कोटी 41 लक्ष ऐवजी भांडवली अनुदानात वाढ झाल्याने भांडवली खर्च रु.1996 कोटी 39 लक्ष सुधारित करण्यात आला आहे. तसेच सन 2026-27 चा मूळ अर्थसंकल्पामध्ये महसूली उत्पन्न 4078 कोटी अपेक्षित असून अनुदान व कर्जासह 6221 कोटी 12 लक्ष रकमेची जमा बाजू 3818 कोटी 17 लक्ष महसूली खर्च व 2401 कोटी 55 लक्ष भांडवली खर्चाचा रु. 1 कोटी 40 लक्ष अखेरच्या शिलकेसह रु. 6221 कोटी 12 लक्ष रुपयांचा मूळ अर्थसंकल्प असल्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले.

या पत्रकार परिषदेस, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयक्त मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिपक शिंदे, ठाणे परिवहन सेवेचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, व्यासपीठावर उपस्थित होते. त्याचवेळी परिवहन उपक्रमाचे सन 2026-27 चे मूळ अंदाजपत्रक 791 कोटी 86 लक्ष महापालिका आयुक्त सौरभ राव यांना ठाणे परिवहन सेवेचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांनी सादर केले.

मालमत्ता कर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असून मालमत्ता कर व फी पासून सन 2025-26 मध्ये रु. 920 कोटी इतके उत्पन्न अंदाजित होते. ते डिसेंबर 2025 पर्यंत रु. 536 कोटी 35 लक्ष इतके प्रत्यक्ष प्राप्त झाले आहे. सन 2026-27 या आर्थिक वर्षात मालमत्ता कराच्या उत्पन्नाचे अर्थसंकल्पीय अंदाज रु. 1200 कोटी इतके प्रस्तावित आहेत.

कर वसुली विभागांतर्गत मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे उपाययोजना योजिल्या आहेत.

दररोज वाचा ... दै. महाराष्ट्र सम्राट


### नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता विभाग

निविदा सूचना क्र. नमुंमपा/का.अ.(नेरूळ)/ 56 /2025-26

कामाचे नाव :- नेरुळ, शिरवणे गणेश मंदीर जवळील गटाराची दुरुस्ती करणे.

अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) :- 4,01,397/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.24/03/2026 रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
उमेश पाटील
कार्यकारी अभियंता (नेरूळ)
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/223/2026


## ग्रामीण कौशल्याचा जागर: वाशीत 'महालक्ष्मी सरस २०२६' च्या भव्य प्रदर्शनास सुरवात

## महिला बचत गटांच्या कौशल्यपूर्ण दर्जेदार उत्पादनांना प्रोत्साहन देण्याचे ग्राम विकास मंत्री यांचे आवाहन

मुंबई - ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आणि त्यांच्यातील कलागुणांचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या उमेद अभियाना मार्फत आयोजित 'महालक्ष्मी सरस २०२६' या प्रदर्शनाचे दरवर्षी आयोजन करण्यात येत असते. यंदा नवी मुंबईतील वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे दि.२४ मार्चे ते ४ एप्रिल २०२६ या कालावधीत सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत हे प्रदर्शन विनामुल्य सुरु राहणार आहे.

या प्रदर्शनाचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे राज्यातील दुर्गम भागातून आलेल्या महिला बचत गटांच्या ग्रामीण भगिनींच्या कौशल्यपूर्ण आणि दर्जेदार उत्पादनांना राज्यस्तरीय व्यापक बाजारपेठेत विक्रीची संधी प्राप्त होते. या महिलांनी आपल्या मेहनतीने आणि जिद्दीने तयार केल्याल्या या उत्पादनांना नेहमीच मोठ्या प्रमाणात ग्राहकांची पसंती मिळत आली आहे.

राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी नागरिकांनी या प्रदर्शनाला आर्वजून भेट देऊन महिला बचत गटांच्या कौशल्यपूर्ण दर्जेदार उत्पादनांना प्रोत्साहन देत ग्रामीण महिलांच्या कष्टकरी प्रवासाला साथ देण्याचे आवाहन केले आहे.

**प्रदर्शनात एकूण ४९० स्टॉल्सचा समावेश** - यावर्षीचे प्रदर्शन अधिक भव्य आणि सुसज्ज करण्यात आले असून, यामध्ये एकूण ४९० स्टॉल्सचा समावेश आहे. खवय्यांसाठी विशेष आकर्षण म्हणजे यात १०० फूड स्टॉल्स लावण्यात आले आहेत, जिथे अस्सल ग्रामीण चवीच्या पदार्थांचा आस्वाद घेता येणार आहे. त्याचसोबत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांसह इतर राज्यांतून आलेल्या कारागिरांचे वैविध्यपूर्ण स्टॉल्सही आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.

**वातानुकूलित महालक्ष्मी सरस प्रदर्शन** - नागरिकांच्या सोयीसाठी प्रदर्शनाचे संपूर्ण क्षेत्र पूर्णतः वातानुकूलित (Air-Conditioned) असून, सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे. ग्रामीण महिलांच्या पारंपारिक कौशल्याला जागतिक दर्जा मिळावा यासाठी या प्रदर्शनात उच्च दर्जाचे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक मार्केटिंग पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. डिजिटल व्यवहार आणि नाविन्यपूर्ण सादरीकरणामुळे ग्रामीण महिलांची उत्पादने आजच्या आधुनिक युगाशी स्पर्धा करण्यासाठी सज्ज झाली आहेत.

**२४ मार्च ते ४ एप्रिल दरम्यान सकाळी १० ते रात्री १० पर्यंत प्रदर्शनाचे आयोजन**

मंत्री जयकुमार गोरे यांनी म्हटले आहे की, बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला आज स्वावलंबी होत आहेत. इतर राज्यांतील आणि महाराष्ट्रातील या भगिनींच्या उत्पादनांची खरेदी करून कष्टकऱ्यांच्या आयुष्यात समृद्धी आणण्यासाठी मुंबई आणि नवी मुंबईतील नागरिकांनी मोठ्या संख्येने महालक्ष्मी सरस प्रर्दशनास आर्वजून भेट द्यावी, असे आवाहन ग्रामविकास मंत्री श्री.गोरे यांनी केले आहे.


सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग,
ठाणे, वेस्ट व्ह्यू, तिसरा मजला,राम मारुती रोड, ठाणे (प.) ४००६०१.

### Public Notice

Service Request Number : THN/00444/18/26
Inquiry/case No. : ACC/I/67/2026
Name of the Trust : ATAL SEVA PRATISHTHAN
**Address of the Trust :** LOKMANYA POL NO. C-17, WAGLE ESTATE, THANE (W), THANE, THANE, THANE
**Name of the Applicant :** MAHESH SUBHASH SAPKALE

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 23/03/2026.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane



### ठाणे महानगरपालिका, ठाणे

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिकेच्या तहकूब अर्थसंकल्पीय विशेष मा.सर्वसाधारण सभेचे परिपत्रक
सभा सूचना क्रमांक ०१ दिनांक १३/०३/२०२६
सभा क्रमांक ०२ दिनांक २५/०३/२०२६

प्रति.
सन्मा. श्री श्रीमती -------------------------------------
सदस्य / सदस्या,
साणे महानगरपालिका, ठाणे.

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची अर्थसंकल्पीय विशेष मा.सर्वसाधारण सभा सोमवार दि. २३/०३/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सूचना क्रमांक ०१, दि.१३/०३/२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार-विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदरची सभा तहकूब झाल्याने, सदर सभा बुधवार, दिनांक २५/०३/२०२६ रोजी ठाणे महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सकाळी ठिक ११.३० वाजता आयोजित करण्यांत आली असून, सदर सभेत सभा सुचना क्रमांक ०१, दिनांक १३/०३/२०२६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यांत येईल.

तरी सदर सभेस कृपया आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा. महापौर सो., यांचे मंजूरीने.

ठामपा/पिआरओ/सचिव/१३४१/२०२५-२६
दि:२३.०३.२०२६

सही/-
महापालिका सचिव
ठाणे महानगरपालिका,ठाणे

Pls visit our official web-site
www.thanecity.gov.in

"ठाणे सुंदर ठेवूया - कर वेळेत भरुया"



Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor, Administrative Office "B" Govt. Offices Complex, Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

### Public Notice

Service Request Number : PLG/04478/18/25
Inquiry/case No. : . **ACC/482/2025**
Name of the Trust : **SHANTIDEVI SINGH MEMORIAL EDUCATIONAL TRUST**
**Address of the Trust : F 404 4TH FLOOR KALASH APARTMENT OPPOSITE YASHAVANT VAIBHAV, OFF VASAI NALASOPARA LINK ROAD NEAR FIRE BRIGADE, NALASOPARA EAST PALGHAR, VASAI, VASAI**
**Registration Number of the Trust (if)** : SHANTIDEVI SINGH MEMORIAL EDUCATIONAL TRUST
**Name of the Applicant :** MR. VINIT TEJBHAN SINGH

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 12/02/2026.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar



Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor, Administrative Office "B" Govt. Offices Complex, Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

### Public Notice

Service Request Number : PLG/04447/18/25
Inquiry/case No. : . **ACC/454/2025**
Name of the Trust : **SATAM FOUNDATION**
**Address of the Trust : VN03/23904, K. T. NAGAR PHASE II CHS. LTD., SAI NAGAR, VASAI ROAD WEST, VASAL PALGHAR, VASAI, VASAI**
**Registration Number of the Trust (if)** : SATAM FOUNDATION
**Name of the Applicant :** ABHISHEK SHIVAJI SATAM

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 12/02/2026.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar



Public Trusts Registration Office, Palghar
Address: Palghar region, Palghar, 2 nd floor, Administrative Office "B" Govt. Offices Complex, Boisar Road, Kolgaon Palghar, Palghar.

### Public Notice

Service Request Number : PLG/00750/18/26
Inquiry/case No. : . **ACC/47/2026**
Name of the Trust : **LEARN AND PLAY EDUCATIONAL TRUST**
**Address of the Trust : C/O. KIRAN SHINDE, MH-603, HOUSE TAX NO. VR06/1692/129, NAVKAR AVENUE , MANVELPADA ROAD, VIRAR (EAST), NEAR MANVELPADA TALAV, VIVA JANGID COMPLEX, PALGHAR, VASAI, VASAI**
**Registration Number of the Trust (if)** : LEARN AND PLAY EDUCATIONAL TRUST
**Name of the Applicant :** SWATI KIRAN SHINDE

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Palghar Region, Palghar

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only (In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only (In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 23/03/2026.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Palghar

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर एक्झिक्युटिव असिस्टंट
2 ज्युनियर एक्झिक्युटिव
3 इंजिनिअर
4 ऑफिसर – Finance (CA)
5 ऑफिसर – Finance (CMA)
6 ऑफिसर – Finance (MBA)
7 ऑफिसर – HR
8 ऑफिसर – IS
9 ज्युनियर एक्झिक्युटिव/ असिस्टंट ऑफिसर-Official Language
10 ऑफिसर (CBG Operations)
11 HR लीगल ऑफिसर
12 सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर-सेफ्टी
13 सिनियर ऑफिसर-CBG Operations
14 सिनियर ऑफिसर-CGD
15 सिनियर ऑफिसर-सेल्स
16 सिनियर ऑफिसर-Benzene/Toluene Handling
17 असिस्टंट मॅनेजर/मॅनेजर
18 सिनियर ऑफिसर/ असिस्टंट मॅनेजर/ मॅनेजर
19 मॅनेजर-Plant Operations
20 असिस्टंट मॅनेजर-Plant Maintenance
21 सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर- Feedstock Procurement
22 सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर- Company Secretary
23 मॅनेजर/सिनियर मॅनेजर
24 मॅनेजर
25 डेप्युटी जनरल मॅनेजर- Technical Services
26 डेप्युटी जनरल मॅनेजर-Polymer Export 01
27 असिस्टंट मॅनेजर/मॅनेजर- IS 03
28 मॅनेजर/सिनियर मॅनेजर- IS 01
29 असिस्टंट मॅनेजर/मॅनेजर/सिनियर मॅनेजर- HR 05
30 सिनियर सायबर सिक्युरिटी स्ट्रॅटेजिस्ट & ॲडव्हायझर – IT & OT (FTC) 01
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: कोणत्याही शाखेतील पदवी
पद क्र.2: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Civil/Mechanical/ Electrical/Chemical) किंवा (B. Sc. Chemistry) किंवा BBA/ BBA (Honours)/ BMS+HR किंवा फायर सेफ्टी डिप्लोमा
पद क्र.3: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/Electrical/ Civil/Chemical)
पद क्र.4: (i) पदवीधर (ii) CA
पद क्र.5: (i) पदवीधर (ii) CMA
पद क्र.6: (i) पदवीधर (ii) MBA (फायनान्स)
पद क्र.7: PG पदवी (HR/Personnel Management/ Industrial Relations /Psychology) किंवा MBA (HR / Personnel Management)
पद क्र.8: कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग पदवी किंवा MCA
पद क्र.9: (i) हिंदी पदव्युत्तर पदवी (ii) इंग्रजी विषयासह पदवी (iii) 0/3/6 वर्षे अनुभव
पद क्र.10: (i) M.Sc (Microbiology) (ii) 03 वर्षे अनुभव
पद क्र.11: (i) विधी पदवी (ii) 01 वर्ष अनुभव
पद क्र.12: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (ii) इंडस्ट्रियल सेफ्टी डिपलोमा (iii) 05/08 वर्षे अनुभव
पद क्र.13: (i) कोणत्याही शाखेतील इंजिनिअरिंग पदवी (ii) ME/MTech (Biotechnology) (iii) 03 वर्षे अनुभव
पद क्र.14: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) 03 वर्षे अनुभव
पद क्र.15: इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (ii) MBA/ PGDM (ii) 02 वर्षे अनुभव
पद क्र.16: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Chemical/ Petrochemical) (ii) 03 वर्षे अनुभव
पद क्र.17: (i) सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी (ii) 06/09 वर्षे अनुभव
पद क्र.18: M.Sc.(Chemistry) + 6/9/12 वर्षे अनुभव किंवा केमिकल इंजिनिअरिंग पदवी + 3/6/9 वर्षे अनुभव
पद क्र.19: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Biochemical/ Biotechnology/ Microbiology) (ii) 09 वर्षे अनुभव
पद क्र.20: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation) (ii) 06 वर्षे अनुभव
पद क्र.21: M.Sc. (Agriculture)+6/9 वर्षे अनुभव किंवा जिनिअरिंग पदवी (Agriculture)/ MBA(Agribusiness) +3/6 वर्षे अनुभव
पद क्र.22: (i) CA (ii) इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाचे असोसिएट/फेलो सदस्यत्व (ii) 03/06 वर्षे अनुभव
पद क्र.23: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Mechanical/ Electrical/ Civil/ Environmental/ Instrumentation/ Petroleum) (ii) M.Tech/ MSc/ MBA (Environmental Management/ Sustainability Management/Climate Change & Sustainability/ Energy Systems) (iii) 09/12 वर्षे अनुभव
पद क्र.24: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) 09 वर्षे अनुभव
पद क्र.25: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) 18 वर्षे अनुभव
पद क्र.26: (i) MBA (Sales/Marketing/Operations/ Supply) (ii) कोणत्याही शाखेतील पदवी (iii) 18 वर्षे अनुभव
पद क्र.27: (i) कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग पदवी किंवा MCA (ii) 06/09 वर्षे अनुभव
पद क्र.28: (i) कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग पदवी किंवा MCA (ii) 09/12 वर्षे अनुभव
पद क्र.29: (i) PG पदवी (HR/Personnel Management / Industrial Relations /Psychology) किंवा MBA (HR) (ii) 06/09/12 वर्षे अनुभव
पद क्र.30: (i) कॉम्प्युटर सायन्स इंजिनिअरिंग पदवी (ii) 12/16 वर्षे अनुभव
वयाची अट: 25 मार्च 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1, 2, 3, & 8: 25 वर्षांपर्यंत
पद क्र.4 ते 7: 27 वर्षांपर्यंत
पद क्र.9: 27/ 30/ 33 वर्षांपर्यंत
पद क्र.10 & 13: 30 वर्षांपर्यंत
पद क्र.11: 26 वर्षांपर्यंत
पद क्र.12: 30/33 वर्षांपर्यंत
पद क्र.14 & 16: 28 वर्षांपर्यंत
पद क्र.15: 29 वर्षांपर्यंत
पद क्र.17: 31/34 वर्षांपर्यंत
पद क्र.18: 33/ 36/ 39/28/ 31/ 34 वर्षांपर्यंत
पद क्र.19 & 24: 34 वर्षांपर्यंत
पद क्र.20: 31 वर्षांपर्यंत
पद क्र.21: 33/36/30/33 वर्षांपर्यंत
पद क्र.22: 30/33 वर्षांपर्यंत
पद क्र.23: 36/39 वर्षांपर्यंत
पद क्र.25 & 26: 45 वर्षांपर्यंत
पद क्र.27: 31/34 वर्षांपर्यंत
पद क्र.28: 34/37 वर्षांपर्यंत
पद क्र.29: 33/36/39 वर्षांपर्यंत
पद क्र.30: 39/43 वर्षांपर्यंत
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹1180/- [SC/ST/PWD: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 25 मार्च 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.hindustanpetroleum.com/

## भारतीय सैन्य महिला अग्निवीर

■ जाहिरात क्र.: नमूद नाही
■ सहभागी राज्य: महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि दमण, दीव, दादरा & नगर हवेली राज्य
■ पदाचे नाव & तपशील:
1 अग्निवीर (जनरल ड्यूटी) लष्करी महिला पोलीस
■ शैक्षणिक पात्रता: 45% गुणांसह 10वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता: उंची: 162 सेमी.
■ वयाची अट: जन्म 01 जुलै 2005 ते 01 जुलै 2009 दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: ₹250/-
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 01 एप्रिल 2026
Phase I: परीक्षा (Online): 01 ते 15 जून 2026
Phase II: भरती मेळावा
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianarmy.nic.in/

## महानदी कोलफील्ड्स लिमिटेड

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर ओव्हरमन T&S
2 माइनिंग सिरदार T&S
3 सर्व्हेअर
4 ट्रान्सलेटर (Tr.) OL क्लेरिकल ग्रेड III
5 टेक्निशियन (पॅथोलॉजी) Tr. T&S ग्रेड-C
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: (i) माइनिंग इंजिनिअरिंग डिप्लोमा (ii) ओवरमन प्रमाणपत्र (iii) प्रथमोपचार प्रमाणपत्र (iv) गॅस परिक्षण प्रमाणपत्र
पद क्र.2: (i) 10वी उत्तीर्ण किंवा माइनिंग इंजिनिअरिंग डिप्लोमा/पदवी (ii) माइनिंग सिरदारशिप प्रमाणपत्र (iii) प्रथमोपचार प्रमाणपत्र (iv) गॅस परिक्षण प्रमाणपत्र
पद क्र.3: (i) 10वी उत्तीर्ण किंवा माइनिंग/माईन सर्वेइंग इंजिनिअरिंग डिप्लोमा/पदवी (ii) सर्व्हे प्रमाणपत्र
पद क्र.4: (i) BA (हिंदी/इंग्रजी) (ii) हिंदी ट्रांसलेशन डिप्लोमा
पद क्र.5: पॅथोलॉजी डिप्लोमा
■ वयाची अट: 06 एप्रिल 2026 रोजी 18 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: ओडिशा
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.mahanadicoal.in/

## भारत संचार निगम लिमिटेड

■ पदाचे नाव & तपशील:
1 सिनिअर एक्झिक्युटिव ट्रेनी (DR)-टेलिकॉम स्ट्रीम
2 सिनिअर एक्झिक्युटिव ट्रेनी (DR)-फायनान्स स्ट्रीम
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: 60% गुणांसह B.E./B.Tech (Electronics and telecommunication/Electronics /Computer Science /Information Technology /Electrical / Instrumentation)
पद क्र.2: CA/CMA
■ वयाची अट:
07 मार्च 2026 रोजी 21 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ₹2500/- [SC/ST/PWD: ₹1250/-]
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 31 मार्च 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल
■ अधिकृत संकेतस्थळ https://bsnl.co.in/en

## UPSC मार्फत संयुक्त वैद्यकीय सेवा परीक्षा

■ परीक्षेचे नाव: संयुक्त वैद्यकीय सेवा परीक्षा 2026 (CMS)
■ पदाचे नाव & तपशील:
1 केंद्रीय आरोग्य सेवा उप-संवर्गातील सामान्य कर्तव्य वैद्यकीय अधिकारी
2 रेल्वेमध्ये सहाय्यक विभागीय वैद्यकीय अधिकारी
3 नवी दिल्ली महानगरपालिका परिषदेत सामान्य कर्तव्य वैद्यकीय अधिकारी
4 दिल्ली महानगरपालिकेत सामान्य कर्तव्य वैद्यकीय अधिकारी श्रेणी-II
■ शैक्षणिक पात्रता: MBBS पदवी.
■ वयाची अट: 01 ऑगस्ट 2025 रोजी 32 वर्षांपर्यंत [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ Fee: General/OBC: ₹200/- [SC/ST/PWD/महिला: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 31 मार्च 2026
■ परीक्षा: 02 ऑगस्ट 2026
■ अधिकृत संकेतस्थळ https://upsc.gov.in/

## भारतीय सैन्य अग्निवीर

■ पदाचे नाव & तपशील:
1 अग्निवीर [(जनरल ड्यूटी (GD)]
2 अग्निवीर (टेक्निकल)
3 अग्निवीर लिपिक/स्टोअर कीपर टेक्निकल
4 अग्निवीर ट्रेड्समन (10वी उत्तीर्ण)
5 अग्निवीर ट्रेड्समन (08वी उत्तीर्ण)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: 45% गुणांसह 10वी उत्तीर्ण.
पद क्र.2: 50% गुणांसह 12वी उत्तीर्ण (PCM & English). किंवा 50% गुणांसह 10वी उत्तीर्ण+ ITI/ डिप्लोमा. (Mechanic Motor Vehicle/Mechanic Diesel/ Electronic Mechanic/Technician Power Electronic Systems/Electrician/ Fitter/Instrument Mechanic/ Draughtsman (All types)/ Surveyor/ Geo Informatics Assistant/Information and Communication Technology System Maintenance / Information Technology/ Mechanic Cum Operator Electric Communication System/ Vessel Navigator/ Mechanical Engineering / Electrical Engineering/ Electronics Engineering/ Auto Mobile Engineering / Computer Science/Computer Engineering / Instrumentation Technology)
पद क्र.3: 60% गुणांसह 12वी उत्तीर्ण (Arts,Commerce, Science).
पद क्र.4: 10वी उत्तीर्ण.
पद क्र.5: 08वी उत्तीर्ण.
■ शारीरिक पात्रता:
पद क्र. पदाचे नाव उंची (सेमी) वजन (KG) छाती (सेमी)
1 अग्निवीर [(जनरल ड्यूटी (GD)] 168 आर्मी मेडिकल स्टँडर्डनुसार उंची आणि वयाच्या प्रमाणात. 77/82
2 अग्निवीर (टेक्निकल) 167 76/81
3 अग्निवीर लिपिक/स्टोअर कीपर टेक्निकल 162 77/82
4 अग्निवीर ट्रेड्समन (10वी उत्तीर्ण) 168 76/81
5 अग्निवीर ट्रेड्समन (08वी उत्तीर्ण) 168 76/81
■ सहभागी जिल्हे:
अ. क्र. ARO सहभागी जिल्हे
1 RO (HQ) पुणे अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे & सोलापूर.
2 ARO औरंगाबाद (छ.संभाजीनगर) छ.संभाजीनगर, बुलडाणा, हिंगोली, जळगाव, जालना, नांदेड & परभणी.
3 ARO कोल्हापूर कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, उत्तर गोवा & दक्षिण गोवा
4 ARO नागपूर नागपूर, अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा, वाशीम, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर & गोंदिया.
5 ARO मुंबई मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, नंदुरबार & धुळे.
भरती मेळाव्याचे ठिकाण:
अ. क्र. ARO ठिकाण
1 RO (HQ) पुणे No.3 Rajendra Sinhji Road, Near New Poona Club Pune- 411001 (maharashtra) Contact Details : 020-26345005
2 ARO औरंगाबाद (छ.संभाजीनगर) Army Recruiting Office, Aurangabad (ch Sambhajinagar) T/39 Assey Lines, Aurangabad (ch Sambhajinagar)-431002 (maharashtra) Contact Details – 0240-2371418
3 ARO कोल्हापूर Military Station Temblai Hill, University Road Contact Details – 0231-2606419
4 ARO नागपूर Opposite Nagpur Railway Station Contact Details – 0712-2958867
5 ARO मुंबई Near Afgan Church Colaba Military Station, Colaba Mumbai-400005 (Maharashtra) Contact Details – 022-22153510
■ वयाची अट: जन्म 01 जुलै 2005 ते 01 जुलै 2009 दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
Fee: ₹250/-
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 01 एप्रिल 2026
Phase I: परीक्षा (Online): 01 ते 15 जून 2026
Phase II: भरती मेळावा
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.indianarmy.nic.in/

## महावितरण अप्रेंटिस

■ पदाचे नाव & तपशील:
1 इलेक्ट्रिशियन (वीजतंत्री)
2 वायरमन (तारतंत्री)
■ शैक्षणिक पात्रता: (i) 10वी उत्तीर्ण (ii) ITI-NCVT (इलेक्ट्रिशियन/वायरमन)
■ वयाची अट: नमूद नाही
■ नोकरी ठिकाण: बारामती
■ Fee: फी नाही.
■ अर्ज करण्याची पद्धत: Online/Offline
कागदपत्रे सादर करण्याचे ठिकाण: अधीक्षक अभियंता, महावितरण, ऊर्जा भवन, दुसरा मजला, भिगवण रोड, बारामती आवक-जावक कक्ष
■ कागदपत्रे व अर्ज सादर करण्याचा कालावधी: 16 मार्च ते 02 एप्रिल 2026
■ अधिकृत संकेतस्थळ https://www.mahadiscom.in/

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव & तपशील:
1 वैद्यकीय अधिकारी, गट-ब
■ शैक्षणिक पात्रता: M.B.B.S पदवी
■ वयाची अट: 01 जुलै 2026 रोजी 19 ते 38 वर्षे [मागासवर्गीय/आ.दु.घ/अनाथ: 05 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ Fee: खुला प्रवर्ग: ₹394/- [मागासवर्गीय/आ.दु.घ/अनाथ/ दिव्यांग: ₹294/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 09 एप्रिल 2026
■ अधिकृत संकेतस्थळ https://mpsc.gov.in/home



# आझाद मैदानावर ‘करो या मरो’

### धनगर समाजाचा आरक्षणासाठी निर्णायक लढा

मुंबई: धनगर जमातीच्या घटनादत्त ST आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर सुरू असलेले दीपकभाऊ बोऱ्हाडे यांचे आमरण उपोषण दिवसेंदिवस तीव्र होत चालले आहे. १६ मार्च रोजी पुण्यश्लोक मल्हारराव होळकर यांच्या जयंतीदिनी सुरू झालेल्या या आंदोलनाचा आज आठवा दिवस असून, राज्यभरातून मोठ्या संख्येने धनगर समाज बांधव आझाद मैदानात दाखल होत आंदोलनाला पाठिंबा देत आहेत.

या आंदोलनाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ मुंबईपुरते मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या विविध भागांतून समाज एकवटत असल्याचे चित्र दिसत आहे. ST आरक्षणाची अंमलबजावणी आणि प्रमाणपत्र मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा ठाम निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे. “करो या मरो”ची भूमिका घेत हा लढा अधिक आक्रमक करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने तात्काळ दखल घेऊन धनगर समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून सातत्याने केली जात आहे. मात्र अद्याप ठोस निर्णय न झाल्याने समाजामध्ये नाराजीचे वातावरण असून, आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, या आंदोलनाला विविध स्तरांतून पाठिंबा मिळत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषणसिंह राजे होळकर यांनी आझाद मैदानावर भेट देत दीपकभाऊ बोऱ्हाडे यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला. त्यांच्या भेटीमुळे आंदोलनकर्त्यांना अधिक बळ मिळाल्याचे सांगितले जात आहे.एकूणच, धनगर समाजाच्या ST आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले हे आंदोलन सध्या राज्यभरात चर्चेचा विषय ठरत असून, पुढील काही दिवसांत शासनाची भूमिका काय असते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ठाण्यात शिवछत्रपतींच्या पराक्रमाचा जाज्वल्य जागर

### धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या चैत्र नवरात्रौत्सवात ‘स्वराज्याचे आख्यान’ मधून पराक्रम, त्याग आणि स्वाभिमानाची अनुभूती

ठाणे : महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज तसेच स्वराज्य रक्षक धर्मवीर संभाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि स्वराज्याच्या तेजस्वी इतिहासाचे आकलन करून देणारे ‘स्वराज्याचे आख्यान’ रविवारी ठाण्यात उत्साहात पार पडले. धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने कोपरीत आयोजित श्री अंबे माँ चैत्र नवरात्रौत्सवामध्ये उपस्थित भाविकांना पराक्रम, त्याग आणि स्वाभिमानाची अनुभूती लाभली. या प्रसंगी अभिनेते सिद्धार्थ बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठानच्या वतीने ठाणे पूर्वेतील कोपरी येथील संत तुकाराम महाराज मैदानात चैत्र नवरात्रोत्सवानिमित्त सहस्त्रचंडी हवनात्मक नवकुंडीय महायज्ञ सुरू आहे. या धार्मिक सोहळ्यात दररोज शेकडो भाविक दर्शन व भंडाऱ्याचा लाभ घेत आहेत. उत्सवादरम्यान देवीचा मंगलाभिषेक, सप्तशती पाठ, सामूहिक राजोपचार पूजन, अर्चना, मध्यान्ह आरती आणि सांज आरती अशा विविध धार्मिक उपक्रमांसोबतच दररोज सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. रविवारी सायंकाळी पार पडलेल्या ‘स्वराज्याचे आख्यान’ ची सुरुवात गण सादरीकरणाने झाली. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांना वंदन करून आख्यानाला प्रारंभ झाला. शिवकालीन कवी भूषण यांची महती विषद केल्यानंतर ‘पोतराज आलाय भेटीला’ सारख्या पारंपरिक सादरीकरणांनी वातावरण शिवमय होऊन गेले. कार्यक्रमात स्वराज्याच्या इतिहासातील अनेक पराक्रमी व्यक्तिमत्त्वांच्या प्रेरणादायी कथा उलगडण्यात आल्या. हिरोजी फर्जंद, हिरोजी इंदलकर, हिरकणी, सरनोबत हंबीरराव मोहिते, संताजी घोरपडे, बहिर्जी नाईक, धनाजी जाधव यांसारख्या शूरवीरांच्या पराक्रमाला यावेळी उजाळा देण्यात आला. तसेच, छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा प्रसंगही थरारक पद्धतीने उभा करण्यात आला. यावेळी सभागृहात छत्रपतींचा जयजयकार झाला.

देवी मातेचा गोंधळ, शाहिरी पिंगळा, गवळण आणि ओवी यांसारख्या लोकपरंपरांनी आख्यानाला सांस्कृतिक रंगत चढली. यावेळी १२ स्वरचित व नविन गीतांचे सादरीकरण झाले. शाहिर मल्हार बेलोसे, गणेश बागूल आणि आशुतोष सूर्यवंशी यांनी आपल्या कलागुणांनी प्रेक्षकांची मने जिंकली. अभिजीत गायकवाड यांनी मुख्य सूत्रधार म्हणून ‘स्वराज्याचे आख्यान’ कार्यक्रमात प्रभावी भूमिका बजावली. त्यांच्या दमदार खर्जातील निवेदनाने जणु इतिहास जिवंत झाला. यावेळी त्यांनी चिमुकल्या मावळ्यांना व्यासपीठाजवळ बोलावून छत्रपतींच्या विचारांचे पालन करण्याची शपथ दिली. कार्यक्रमाचा समारोप महाराष्ट्र राज्य गीताने झाला.

या प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सौ. लता एकनाथ शिंदे, अभिनेते सिद्धार्थ बोडके, अभिनेते मंगेश देसाई, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, माजी महापौर मिनाक्षी शिंदे, शिवसेना सचिव संजय मोरे, जयप्रकाश कोटवानी, प्रमोद बनसोडे, राहुल लोंढे, किरण नाकती यांच्यासह अनेक शिवसेना नगरसेवक, पदाधिकारी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चैत्र नवरात्रौत्सवात या सारख्या उपक्रमांमुळे नव्या पिढीला स्वराज्याचा इतिहास आणि छत्रपतींचे विचार समजण्यास मदत झाली.”स्वराज्याचे आख्यान’ ऐकुन समाजात देशभक्तीची भावना अधिक दृढ होत आहे, अशी प्रांजळ कबुली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सौभाग्यवती सौ.लता वहिनीनी दिली. तर, असे कुटुंब आणि सहकारी सोबतीला असल्याने भविष्यात एकनाथ शिंदे भारताचे पंतप्रधान बनतील. असे भाकित अभिनेता सिद्धार्थ बोडके यांनी वर्तवले.

# युद्धाच्या रणधुमाळीत निसर्ग ‘मूक बळी’; भारताने घ्यावे नेतृत्व!

### ■ पर्यावरण अभ्यासक डॉ. प्रशांत सिनकर यांचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र ■ ‘पर्यावरणीय शांतते’साठी भारताने पुढे यावे

ठाणे : सध्या जग अत्यंत अस्थिर आणि चिंताजनक परिस्थितीतून जात असून विविध देशांमधील संघर्ष आणि युद्धजन्य तणावामुळे मानवी जीवनावर मोठे संकट ओढवले आहे. मात्र या रणधुमाळीत निसर्ग, पर्यावरण आणि वन्यजीव हेच खरे ‘मूक बळी’ ठरत आहेत. त्यांच्या वेदना जागतिक पातळीवर फारशा ऐकू येत नसल्याची खंत व्यक्त करत, युद्धकाळात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी भारताने पुढाकार घेऊन जागतिक नेतृत्व करावे, अशी आग्रही मागणी ठाण्याचे पर्यावरण अभ्यासक डॉ. प्रशांत सिनकर यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलेल्या पत्राद्वारे केली आहे.

“युद्ध म्हणजे केवळ सीमावाद किंवा राजकीय वर्चस्वाची लढाई नाही, तर तो निसर्गावर होणारा सर्वात मोठा अत्याचार आहे,” असे डॉ. सिनकर यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. आधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर, रासायनिक प्रदूषण आणि भीषण स्फोटांमुळे हजारो एकर जंगलांचा नाश होत असून



नद्या विषारी बनत आहेत. या संघर्षाशी कोणताही संबंध नसलेल्या वन्यजीवांना आपले अधिवास गमवावे लागत असून पर्यावरणीय समतोल ढासळत आहे.

भारत हा ‘वसुधैव कुटुंबकम्’ या मूल्यावर चालणारा देश असून ‘मिशन LiFE’च्या माध्यमातून शाश्वत जीवनशैलीचा संदेश जगाला देत आहे. याच पार्श्वभूमीवर डॉ. सिनकर यांनी ‘पर्यावरणीय शांतता’ (Environmental Peacebuilding) हा नवा दृष्टिकोन पुढे आणत, युद्धकाळातील पर्यावरणीय हानीला ‘मानवतावादी गुन्हा’ घोषित करण्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर पुढाकार घ्यावा, अशी मागणी केली आहे. तसेच ‘युनायटेड नेशन्स’च्या माध्यमातून यासाठी विशेष तांत्रिक कार्यगट स्थापन करण्याचीही सूचना त्यांनी केली आहे.

युद्धग्रस्त सीमावर्ती भागांतून स्थलांतर करणाऱ्या वन्यजीवांसाठी सुरक्षित मार्गिका (Safe Passages) निर्माण करण्याबाबत आंतरराष्ट्रीय करार व्हावा, तसेच युद्धानंतर त्या भागातील जैवविविधता पुनर्संचयित करण्यासाठी ‘इकोलॉजिकल रिस्टोरेशन फंड’ उभारण्यात यावा, असे महत्त्वपूर्ण प्रस्तावही त्यांनी मांडले आहेत.

“जर ही पृथ्वीच राहण्यायोग्य उरली नाही, तर कोणताही विजय किंवा प्रगती अर्थहीन ठरेल. भारताची संस्कृती निसर्गपूजक आहे. त्यामुळे जगाला केवळ युद्धबंदी नव्हे, तर ‘सृष्टी वाचवा’चा संदेश देण्यासाठी भारताने प्रभावी नेतृत्व करणे ही काळाची गरज आहे,” असे भावनिक आवाहन डॉ. सिनकर यांनी आपल्या पत्राच्या शेवटी केले आहे.

या पत्राद्वारे त्यांनी जागतिक शांततेसोबतच ‘पर्यावरणीय शांतता’चा नवा आणि अत्यंत महत्त्वाचा विचार जगासमोर मांडला आहे.

# व्यावसायिक एलपीजीच्या कोट्यात 50 टक्क्यांपर्यंत वाढ

## हॉटेल आणि उद्योगांना मोठा दिलासा



ठाणे (गणेश भोईटे) : देशातील व्यावसायिक एलपीजी (LPG) गॅसच्या पुरवठ्याबाबत केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, राज्यांना दिल्या जाणाऱ्या एकूण कोट्यात आता 50 टक्क्यांपर्यंत मोठी वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे या निर्णयाची माहिती दिली आहे. या निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या सूचनेनुसार करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

या नव्या धोरणानुसार, राज्यांना यापूर्वी मिळणाऱ्या 20 टक्के आणि त्यानंतर सुधारणांच्या आधारे वाढविण्यात आलेल्या 10 टक्के कोट्याव्यतिरिक्त आता अतिरिक्त 20 टक्के कोटा मंजूर करण्यात आला आहे. यामुळे व्यावसायिक एलपीजीचा एकूण पुरवठा आता संकटपूर्व काळातील पातळीच्या 50 टक्क्यांवर पोहोचला आहे. या वाढीव कोट्याचा सर्वाधिक फायदा रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया उद्योग, दुग्धशाळा आणि सरकारी अनुदानित अन्न केंद्रांना होणार आहे. तसेच स्थलांतरित मजुरांसाठी उपलब्ध असलेल्या 5 किलोच्या एफटीएल (FTL) सिलिंडर पुरवठ्यालाही यात प्राधान्य देण्यात आले आहे.

या सुविधेचा लाभ घेण्यासाठी सरकारने काही अटीही लागू केल्या आहेत. सर्व व्यावसायिक आणि औद्योगिक एलपीजी ग्राहकांना संबंधित तेल कंपन्यांकडे (OMCs) आपली अधिकृत नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या कंपन्या ग्राहकांच्या वार्षिक वापराचा आणि त्यांच्या क्षेत्राचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवणार आहेत, जेणेकरून गॅसचा गैरवापर टाळता येईल. यासोबतच, ज्या भागात पाईप गॅसची (PNG) सुविधा उपलब्ध आहे, तिथे ग्राहकांनी पीएनजीसाठी अर्ज करणे आणि त्या वापरासाठीची तयारी दर्शविणे आवश्यक आहे.

या निर्णयामुळे व्यावसायिक क्षेत्रातील इंधन टंचाई दूर होण्यास मदत होणार असून उद्योगांना मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास शासनाने व्यक्त केला आहे.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त

## उलवे येथे वृक्षारोपण; "वृक्ष एक जबाबदारी"चा संदेश

पनवेल : दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज उलवे नोड मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या प्रांगणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, ज्येष्ठ कार्यकर्ते जयवंत देशमुख, अॅड. राहुल घरत, दर्शन ठाकूर, स्वप्नील ठाकूर, विश्वनाथ कोळी, भार्गव ठाकूर, हेमंत पाटील, रोशन म्हात्रे, हेमंत ठाकूर, दीपक गोंधळी, नंदकुमार ठाकूर, रविकांत म्हात्रे, राजू कोळी, किशोर कोळी, रवींद्र भोईर, विशाल कोळी, राजकिरण कोळी, विनायक कोळी, भरत कोळी, दीपाली म्हात्रे, संदेश कोळी, मंगेश कोळी, संतोष कोळी, सृजन कोळी यांच्यासह इतर पदाधिकारी, शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या रोपांचे लागवड करण्यात आले. यावेळी "वृक्ष एक जबाबदारी" हा संदेश देत पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात हरिताई वाढण्यास हातभार लागणार असून, सामाजिक बांधिलकी जपणारा हा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अवघ्या आशा श्रीरामार्पण कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध



पनवेल : श्री रामनवमीचे औचित्य आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक सेल, उत्तर रायगडच्या वतीने एका विशेष सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.' अवघ्या आशा श्रीरामार्पण' या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमातून गीत रामायणाच्या माध्यमातून रामतत्त्वाची कालसुसंगत मांडणी २२ मार्च रोजी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अत्यंत दिमाखात सादर करण्यात आली. भक्ती, संस्कृती आणि सुरेल संगीताचा त्रिवेणी संगम असलेल्या या कार्यक्रमाने उपस्थित शेकडो रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

*माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी कार्यक्रमाला भेट देऊन सादरीकरणाचा आस्वाद घेतला. रामायणातील विचार आजही तितकेच प्रेरणादायी असून संगीताच्या माध्यमातून ते लोकांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. या सांस्कृतिक सोहळ्याला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, आयोजक व नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, गणेश कडू, सुमित झुंजारराव, माजी नगरसेविका सारिका भगत, रुपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, श्याम पुंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात स्नेहल दामले यांनी प्रभावी कथनातून रामायणातील प्रसंग जिवंत केले, तर अभिजीत पंचभाई आणि श्रुती देवस्थळी यांच्या भावपूर्ण गायनाने वातावरण भक्तिमय झाले. त्यांना उद्धव कुंभार, अमित कुंटे आणि प्रसन्न बाम यांनी दर्जेदार वाद्यसंगत दिली.*

# कळवा पाटबंधारे कार्यालय सील; ५३ लाखांच्या थकबाकीवर महापालिकेची कडक कारवाई





ठाणे : ठाणे महानगरपालिकेने कळवा प्रभाग समिती हद्दीतील पाटबंधारे विभागाच्या विविध कार्यालयांवर थेट कारवाई करत संबंधित अभियंत्यांची कार्यालये सील केली आहेत. जलसंपदा विभागातील कार्यालयांकडून मालमत्ता कराची तब्बल ५३ लाख रुपयांची थकबाकी बाकी असल्याने ही कठोर कारवाई करण्यात आली.

या कारवाईत जलसंपदा, मृद व सर्वेक्षण, घाटघर जलविद्युत विभाग, पाटबंधारे विभाग, जल गुणवत्ता प्रयोगशाळा तसेच जलसंधारण विभागाच्या कार्यालयांचा समावेश आहे. महापालिकेकडून वारंवार नोटिसा देऊनही संबंधित विभागांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर प्रशासनाने सील करण्याचा निर्णय घेतला.

याबाबत कळवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त ललिता जाधव यांनी सांगितले की, "थकबाकी वसुलीसाठी सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही प्रतिसाद मिळत नसल्याने ही कारवाई करावी लागली."

दरम्यान, सरकारी कार्यालयांकडूनच कर थकवला गेल्यामुळे प्रशासनाची नाचक्की झाली असून, ठाणे शहरात या कारवाईची जोरदार चर्चा सुरू आहे.

पावसाळ्यापूर्व तयारीच्या अनुषंगाने

## पालिका व रेल्वे प्रशासनाचा संयुक्त पाहणी दौरा

भाईंदर : दिनांक २३ मार्च २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती डिंपल विनोद मेहता, आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) आणि उपमहापौर ध्रुवकिशोर मन्साराम पाटील यांनी मिरा भाईंदर शहरातील विविध ठिकाणी पावसाळ्यापूर्व तयारी, नालेसफाई, वाहतूक व्यवस्था व सार्वजनिक सुविधांचा आढावा घेण्यासाठी पाहणी दौरा केला. सदर पाहणी दौऱ्याची सुरुवात भाईंदर (पश्चिम) येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथून करण्यात आली. या ठिकाणी मैदानातील विविध समस्यांचा आढावा घेण्यात आला तसेच तेथे सराव करणाऱ्या खेळाडूंशी व मॉर्निंग वॉकसाठी आलेल्या नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व सूचना जाणून घेण्यात आल्या. यानंतर राधास्वामी सत्संग परिसरातून मिरा रोड रेल्वे स्थानकाकडे वाहणाऱ्या नैसर्गिक जाफरी नाल्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. तसेच भाईंदर रेल्वे स्थानक (पूर्व) येथील केबिन रोडलगत असलेल्या नाल्याची तसेच भाईंदर (पश्चिम) भागातील नाल्यांची पाहणी करण्यात आली. या दरम्यान रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी, पार्किंग व्यवस्थेतील अडचणी तसेच फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाच्या समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी रेल्वे प्रशासनास आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.



तसेच डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर पंकज सिंह यांनी रेल्वे हद्दीत येणाऱ्या नाल्यांच्या साफसफाईबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्पष्ट व सक्त निर्देश दिले. पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे वेळेत, नियमित आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यात यावीत, तसेच साफसफाईदरम्यान कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक ती यंत्रणा, मनुष्यबळ व समन्वय उपलब्ध करून देण्याचे त्यांनी निर्देशित केले. महानगरपालिका व रेल्वे प्रशासनामध्ये समन्वय साधून नागरिकांना पावसाळ्यात कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी संयुक्तपणे कार्य करण्यावर भर देण्यात आला. या पाहणी दौऱ्यादरम्यान रेल्वेचे अभियंता प्रेम सागर (AGM, MRVC), नमित जैन (Central DEN Estate), अजयकुमार पुरोहित (Central DEN South), राजीव सक्सेना (Assistant Divisional Engineer), नरसिंग दास (Assistant Divisional Engineer), महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, शहर अभियंता दिपक खांबित, तसेच संबंधित विभागांचे कार्यकारी अभियंते व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

# उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडची मुंबई इंडियन्ससोबत टी20 लीग 2026 साठी अधिकृत बँकिंग पार्टनर म्हणून भागीदारी

मुंबई : उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (उत्कर्ष एसएफबीएल) ची टी-२० २०२६ च्या लीगसाठी 'मुंबई इंडियन्स' चे अधिकृत बँकिंग भागीदार म्हणून निवड झाली असून बँकेने या महत्वपुर्ण भागीदारीची घोषणा आज केली. बँकेसाठी हा धोरणात्मक भागीदारीचा अतिशय महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या भागीदारीच्या माध्यमातून बँक आपली राष्ट्रीय स्तरावरील ओळख वाढवण्याबरोबरच देशभरातील कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांशी आपले नाते अधिक दृढ करत आहे.

सदर घोषणेसाठी आयोजित विशेष कार्यक्रमाला उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी गोविंद सिंग, मुख्य वित्त अधिकारी सरजुकुमार प्रवीण सिमारिया आणि कन्झ्युमर बँकिंग प्रमुख श्री. सौरभ घोष तसेच मुंबई इंडियन्स फ्रँचायझीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

श्री गोविंद सिंग, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड या ऐतिहासिक भागीदारीबद्दल बोलताना म्हणाले , "मुंबई इंडियन्ससारख्या संघासोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे कारण हा एक असा संघ आहे ज्यांनी कामगिरी, नेतृत्व आणि चाहतावर्गाशी संवाद यात सातत्याने नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. ही भागीदारी देशभरातील ग्राहकांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्याच्या आमच्या




वचनबद्धतेचे प्रतीक आहे, तसेच, देशातील या अत्यंत लोकप्रिय क्रीडा व्यासपीठामुळे आमच्या ब्रँडची ओळख जनसामान्यात अधिक मजबूत होणार आहे."

मुंबई इंडियन्सच्या प्रवक्त्याने या भागीदारीबद्दल बोलताना सांगितले की, "उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकचे मुंबई इंडियन्स परिवारात स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. त्यांची मजबूत मूल्ये, ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन आणि आर्थिक समावेशनाबाबतची बांधिलकी आमच्या विचारसरणीशी सुसंगत आहे. आम्ही प्रभावी भागीदारीची अपेक्षा करतो."

या भागीदारीचा एक भाग म्हणून, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेचे चे उद्दिष्ट विविध ग्राहक वर्गांशी आपला संवाद आणि सहभाग वाढवणे, तसेच या हंगामादरम्यान राबवल्या जाणाऱ्या एकात्मिक मार्केटिंग उपक्रमांद्वारे व इतर नियोजित कार्यक्रमांद्वारे आपल्या ब्रँडची उपस्थिती अधिक ठळक करणे आहे.




खासदार श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून दोस्ती, मुंब्रा व दिवा परिसरातील रमजान ईद मेला-जत्रेचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल, खेळणी व मनोरंजनाच्या साधनांमुळे परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. सामाजिक ऐक्य व बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित या जत्रेला स्थानिक नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.



स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणारे महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त जिल्हा परिषद ठाणे येथे त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात आयोजित कार्यक्रमात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी देशासाठी दिलेल्या त्यांच्या बलिदानाची आठवण ठेवत त्यांच्या विचारांचे अनुसरण करण्याचा संकल्प व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# २५ मार्चपासून रायगड जिल्हा कबड्डी संघाचे सराव शिबीर

पनवेल : दिनांक २ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत सिन्नर (जि. नाशिक) येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला कबड्डी संघांचे सराव शिबीर आयोजित करण्यात आले आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने हे शिबीर दि. २५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत पनवेल येथे उत्साहात पार पडणार आहे. दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या विशेष कबड्डी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर शिबिराचे आयोजन भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह अॅड. आस्वाद पाटील तसेच रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या कार्यवाह चित्रा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सक्षम तयारी व्हावी, हा या शिबिरामागील मुख्य उद्देश आहे. या शिबिरामध्ये पुरुष संघातील १४ खेळाडू व २ प्रशिक्षक तसेच महिला संघातील १४ खेळाडू व २ प्रशिक्षक अशा एकूण ३२ जणांचा सहभाग असणार आहे. सर्व खेळाडूंसाठी निवास, भोजन व इतर आवश्यक सुविधांची उत्तम व नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक खेळाडूस संपूर्ण स्पोर्ट्स किट्स श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे प्रदान करण्यात येणार आहेत. खांदा कॉलनीतील सिकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित या शिबिराचे उद्घाटन बुधवार दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. या उद्घाटन समारंभाला क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी व कबड्डीप्रेमी उपस्थित राहणार आहेत. शिबिराची संपूर्ण तयारी शिबीर प्रमुख आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक शरद कदम तसेच छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. त्यांच्या अनुभवी मार्गदर्शनामुळे खेळाडूंना तांत्रिक, शारीरिक व मानसिक पातळीवर सक्षम बनविण्यात येणार आहे. या शिबिरातून तयार होणारा रायगड जिल्हा कबड्डी संघ आगामी राज्य स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला असून, या उपक्रमामुळे जिल्ह्यातील कबड्डी खेळाला निश्चितच चालना मिळणार आहे.



## शहीद दिनानिमित्त ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



ठाणे : शहीद दिनानिमित्त जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के- पाटील, शशिकांत गायकवाड, वरूणकुमार सहारे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, तहसिलदार सचिन चौधर, रेवण लेंभे, मीनल दळवी, कार्यकारी दंडाधिकारी पुरुषोत्तम थोरात, लेखाधिकारी आश्लेषा जाधव, राष्ट्रीय सूचना व विज्ञान केंद्राचे संचालक घनश्याम मेहता तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१